नियमीत दिवाणी दावा क्रमांक १७४/२०१२

गंगुबाई भाऊ कोळी, व. .. वादी

वि.

रत्नाबाई गणु कोळी, व ... प्रतिवादी

निशाणी ८५ वरील आदेश

१. वादीनी सदरचा अर्ज कोर्ट कमिशनर यांची नि. १८ वरील आदेशाप्रमाणे फेरनियुक्ती करणेसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, कोर्ट कमिशनर टी.आय.एल.आर. शिरोळ यांनी नि. १८ कडील आदेशाप्रमाणे मोजणी केली नाही. त्यामुळे नि. १८ वरील आदेशाप्रमाणे पूर्वी जमा केलेल्या कमिशन फी मध्येच कमिशन करणेबाबत तसेच दावा मिळकतीस कुलुप लावून प्रतिवादी हे कमिशन कामी गैरहजर राहीलेस कुलुप तोडून सि.स.नं. १६०० व १६०१ मध्ये प्रवेश करणेसाठी बेलिफांची नेमणुक करणेबाबत सदरच्या अर्जाने विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी नि. ८६ कडे सदर अर्जास म्हणणे देवून सदर अर्जास तिव्र विरोध केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार कोर्ट कमिशनर यांनी निशाणी १८ वरील आदेशाप्रमाणे त्यांचा अहवाल दिलेला आहे. सदर अहवालावरुन वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन दावा मिळकतीत ०७.५ चौ. मी. चे अतिक्रमण करुन बांधकाम केलेने सदर अतिक्रमण काढून मिळणे बाबत दाद मागीतली आहे. वादीचे सदर अर्जातील कथने व दावेतील कथने एकमेकांशी विसंगत असल्याने प्रतिवादींनी सदरचा अर्ज फेटाळणे बाबत विनंती केली आहे.

४. वादीतर्फे विधीज्ञ श्री. जे. जे. पोमाजे, व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. के. सी. शिरगुप्पे, यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी १८ वरील आदेशाप्रमाणे कोर्ट कमिशनर टी.आय.एल.आर. यांनी निशाणी ४६ कडे दिनांक २८/१२/२०१२ रोजी अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवालावरुन वादीने दिनांक २४/०३/२०१४ रोजी त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे. सदर दुरुस्तीवरुन वादीस कोर्टकमिशनर यांचा अहवाल मान्य असल्याचे दिसून येते. वादीने सदरचा अर्ज दिनांक १९/०९/२०१४ रोजी म्हणेजेच कोर्ट कमिशनर यांनी अहवाल दिल्यानंतर तब्बल एक वर्ष नऊ महीन्यानी केला आहे.

६. वादीचे असे कथन आहे की, कोर्ट कमिशनर यांना प्रतिवादीने असहकार्य केल्याने त्यांनी दावा मिळकतीचे बाहेरील बाजूने मोजमाप करुन दावा मिळकतीचे आयडेंटीफिकेशन केले. परंतु, दावा मिळकतीत जावून मोजमाप करणे शक्य न झालेने दावा मिळकतीतील बांधकामाचे निश्चित क्षेत्र व त्याचे अचूक मोजमाप याचा नकाशासह समग्र अहवाल देणे कोर्ट कमिशनर यांना अडचणीचे झाले. तसेच कोर्ट कमिशनर यांनी निशाणी १८ वरील आदेशाप्रमाणे अहवाल दाखल केलेला नाही असे वादीचे कथन आहे. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे अभिलेखाचे अवलोकनकेलेअ सता असे दिसून येते की, कोर्ट कमिशनर यांनी निशाणी ४६ कडे अलहीदा अहवाल दिला असल्यामुळे कोर्ट कमिशनर यांना अहवाल देणे अडचणीचे झाले या वादीच्या कथनात तथ्य दिसून येत नाही. तसेच निशाणी १८ वरील आदेशाचे अवलोकन केले असता, वादी म्हणतो तसे प्रतिवादीचे घराचे कुलूप तोडून मोजणी करावी असा आदेश माझे पूर्वहक्कदार यांनी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे कोर्ट कमिशनर यांनी निशाणी १८ वरील आदेशाप्रमाणे मोजणी करुन अहवाल दिलेला नाही या वादीच्या कथनात तथ्य दिसून येत नाही. तसेच सदर दोन्ही कथने

एकमेकाच्या विरुध्द असून वादीच्या दाव्यातील कथनाशी विसंगत दिसून येतात.

७. वादीने एकीकडे कोर्ट कमिशनर यांच्या निशाणी ४६ कडील अहवाल मान्य करुन तशी दावेमध्ये दुरुस्ती केलेली आहे व दुसरीकडे ते सदर अहवाल हा कोर्ट कमिशनर यांनी निशाणी १८ कडील आदेशाप्रमाणे दिलेला नाही असे कथन करत आहेत. त्यामुळे वादीच्या कथनात तथ्य आढळून येत नाही. तसेच सदरचा अर्ज हा कोर्ट कमिशनर यांचा अहवाल आले नंतर तब्बल एक वर्ष नऊ महीन्यानंतर दिलेला आहे. त्याबाबत कोणतेही कारण नमुद केले नाही. तसेच प्रतिवादीने असहकार्य केल्याने दावा मिळकतीची मोजणी करुन अहवाल देण्याबाबत अडचण निर्माण झालेचे कोर्ट कमिशनर यांच्या अहवालावरुन दिसून येत नाही. कोर्ट कमिशनर यांनी जरी प्रतिवादीने असहकार्य केले असले तरी मोजमापे करुन अहवाल दिलेला आहे. त्यामुळे वादी म्हणतात तसे पुन्हा कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता नाही. सदर कारणांचा विचार करता सदरचा अर्ज हा फेटाळणेस पात्र आहे.

८. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे –

अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/–

दिनांकः १८/११ /२०१६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
कुरुंदवाड